जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय, ठाणे शहर.

सर्व पत्रकार बंधू-भगिनी.....

*पोलीस ठाणे:- शिवाजीनगर पोलीस ठाणे अंबरनाथ

गुन्ह्याचा प्रकार:- खून*

दिनांक 07/12/2024 रोजी शिवाजीनगर पोलीस स्टेशन हद्दीतील बारकू पाडा येथील तेजस किराणा स्टोअर समोर इसम (मयत) नामे तुषार शंकर देडे वय 18 , महेश धाबी व हरमन चरणजितसिंग पांडे असे पार्टी करत असताना सदर ठिकाणी दिनांक 08/12/2024 रोजी रात्री 12.45 वा. चे सुमारास यातील आरोपी नामे समीर वाघे वय 22 वर्षे हा आला व तुषार देडे, महेश धाबी व चिरंजीत सिंग पांडे उर्फ हनी सिंग यांना शिवीगाळ करून मेरे पास बडा सामान है डालेंगे तो एक फटके मे मर जायेगा असे बोलून शिवीगाळी करू लागला व त्याच्याकडे असलेल्या चाकूने तुषारच्या गुप्तांगावर व मांडीवर वार करून गंभीर जखमी केले तसेच महेश धबीच्या डोक्यावर वार करून त्याला जखमी केले व पळून गेला होता. तुषार देडे यास हॉस्पिटलला नेले असता त्यास डॉक्टरांनी तपासून मयत घोषित केले होते.

यावरून शिवाजीनगर पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजिस्टर क्रमांक 1028/2040 BNS कलम 103(1), 118(2), 352, 351(3) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला असून सदर गुन्ह्यातील आरोपी याचा शोध घेण्यासाठी मा.वरिष्ठांच्या आदेशाने निरनिराळे पथके तयार करून अथक परिश्रमाने सदर आरोपीस ताब्यात घेण्यात आले असून पुढील कायदेशीर कारवाई शिवाजीनगर पोलीस स्टेशन करीत आहे.

सदर आरोपीचा बारा तासात शोध घेऊन गुन्हा उघडकीस आणल्याबद्दल शिवाजीनगर पोलीस स्टेशनचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

माहितीकरिता....